क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १२ दिनांक १४ / १२ / २००६

विषय: अपंगांसाठी सुयोग्य ठरविण्यात आलेल्या व अंधांच्या सर्व प्रवर्गासाठी विहित केलेल्या पदांवर पूर्ण अंध व्यक्तींची नियुक्ती करण्याबाबत.

संदर्भ : १) कार्यासन अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र.संकीर्ण-२००६/ प्र.क्र.४३८/प्रशा-४ दि.१७.११.२००६.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.२ दि.०४.१०.२००५.

......

कार्यासन अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय क्र.१ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या परिपत्रक क्र.अपंग-२००६/ प्र.क्र.१०६/सुधार-३, दिनांक ०३.११.२००६ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर शासन परिपत्रकात अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदींनुसार अंध व्यक्तींना नियुक्ती देताना त्यांच्यावर होणारा अन्याय टाळण्यासंदर्भात सूचना प्रसृत करण्यात आल्या आहेत.

३. महावितरण कंपनीच्या सर्व संबंधित अधिका-यांना विनंती करण्यात येते की जी पदे अंधांच्या सर्व प्रवर्गासाठी सुयोग्य ठरविण्यात आली असतील अशा पदांवर नियुक्ती देताना इतर अंध (पार्शली साईटेड/ लो व्हीजन) उमेदवारांबरोबर पूर्णतः अंध उमेदवारांचाही विचार करण्यात यावा.

सोबत : वरीलप्रमाणे.

*( सु.य. पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत :
१) विभागीय व त्यावरील स्तराची क्षेत्रीय कार्यालये
२) निगम कार्यालयातील विभाग प्रमुख व कक्ष प्रमुख
- यांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार.

*K/Adm,.Cir.-Handi*

अपंगांसाठी सुयोग्य ठरविण्यात आलेल्या व अंधांच्या सर्व प्रवर्गासाठी विहीत केलेल्या पदांवर पूर्ण अंध व्यक्तींची नियुक्ती करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
परिपत्रक क्रमांक :- अपंग-२००६/प्र.क्र.१०५/सुधार-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३ नोव्हेंबर २००६.

## परिपत्रक

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदींनुसार व मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.५१०/०२ व १२९/०३ संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना त्यांच्या अखत्यारित असलेल्या अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याच्या सूचना यापूर्वी वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात अंधांच्या सर्व प्रवर्गासाठी (टोटल ब्लाईंड / लो व्हीजन / पार्शली साईटेड) विहीत करण्यात आलेल्या अनुशेषाच्या जागेवर पूर्णतः अंध व्यक्ती डावलून केवळ लो व्हीजन अथवा पार्शली साईटेड या प्रकारच्या अंध व्यक्तींची नियुक्ती केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यामुळे पूर्णतः अंध व्यक्तींवर होणारा अन्याय टाळण्याच्या दृष्टीने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, जी पदे अंधांच्या वर नमूद केलेल्या सर्व प्रवर्गासाठी सुयोग्य ठरविण्यात आली असतील व अशा पदांवर नियुक्ती देताना पूर्णतः अंध उमेदवाराबरोबरच पार्शली साईटेड / लो व्हीजन उमेदवार उपलब्ध असतील तर नियुक्ती देताना पूर्णतः अंध उमेदवाराचाही विचार करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(ज. न. राठोड)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति :-
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
त्यांना विनंती करण्यात येते की, वरील परिपत्रक त्यांच्या अधिकार क्षेत्रातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.
सर्व जिल्हाधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषदा.
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे,
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषदा,
सर्व सेवायोजन अधिकारी, जिल्हा सेवायोजन केंद्र,
सामाजिक न्याय विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, का-सुधार-३